नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६१ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

शुक्रवार, दि. १५ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### गडकरींच्या ताफ्यात ३०-४० गाड्या

पुणे (स. गांवकरी) : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करत बसमधून प्रवास करत संत ज्ञानेश्वर महाराज महामार्गाती पहाणी केली. पण, फलटणनंतर गडकरींच्या बसच्या पुढे-मागे गाड्यांची संख्या वाढली आणि ताफ्यात अचानक ३०-४० गाडी असल्याचे समोर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर नितीन गडकरी यांनी ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली. गडकरी यांनी पुणे-हडपसर-दिवे घाट-सासवड-जेजुरी-फलटण-नातेपुते-वेळापूर मार्गे पंढरपूरपर्यंत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या कामाची पाहणी पत्रकारांबरोबच बसमधून केली. या पाहणी दरम्यान फलटणमध्ये त्यांची पत्रकार परिषद होणार होती. या पत्रकार परिषदेला माढ्याचे खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील आणि माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर आलेले. त्यांनी गडकरी यांची भेट घेतली. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती गडकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्याचबरोबर या महामार्गावर आणखी काही नवीन प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

### सहा धरणांतून गाळ काढला जाणार

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील उजनी, गिरणा, गोसीखुर्द, मुळा, जायकवाडी आणि हतनूर धरणांतील गाळ प्रायोगिक तत्वावर काढण्याचा मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या धोरणामुळे प्रकल्पांची पाणी साठवणूक क्षमता वाढणार आहे. शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. नव्या धोरणानुसार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांना ही कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या प्रक्रियेतून मिळणारा महसूल संबंधित सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व दुरुस्ती कामांसाठी वापरला जाणार आहे. धरणांमधून काढण्यात येणारा गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात टाकण्यासाठी पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी फक्त वाहतूक खर्च करायचा असून, कोणतेही स्वामित्व शुल्क आकारले जाणार नाहीत. यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे.

### दमणगंगा खोऱ्यातील पाणी गोदावरी खोऱ्यात येणार

मुंबई (स. गांवकरी) : नाशिक जिल्ह्यातील अंबोली – वेळुंजे प्रवाही वळण योजनेसाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे १६५ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण य़ोजना दमणगंगा खोऱ्यातील वाल नदीच्या नाल्यावर प्रस्तावित आहे. या योजनेव्दारे पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी पूर्व वाहिनी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येणार आहे. या योजनेव्दारे ३२.०४ दशलक्ष घन फूट पाणी उपलब्ध होणार आहे. यापैकी ४.८३ दशलक्ष घ. फू. पाणी साठा स्थानिक वापरासाठी तर २७.२१ द.ल.घ. फू. पाणी साठा गोदावरी खोऱ्यात प्रवाही पध्दतीने वळविण्याचे नियोजन आहे. ४९.२६ कोटी पैकी ४६ कोटी रुपये प्रत्यक्ष कामासाठी तर ३.२६ कोटी रुपये अनुषांगिक कामासाठी मंजूर करण्यात आले आहेत. प्रकल्पास युनिक पायाभूत आयडी देण्याची कार्यवाही गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने करावयाची आहे. कामास दिलेल्या मान्यतेपैकी भूसंपादनासाठी १३.४६ कोटी, कामांसाठी २४.३३ कोटी, पुलासाठी ३.९० कोटी, इमारतीसाठी ३२ लाख, दळणवळणासाठी ३.७० कोटी, वृक्षारोपणासाठी १५ लाख, देखभालीसाठी १२ लाख आणि संकीर्ण १.७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# विदर्भात ४ नवे महामार्ग

## ५१ हजार कोटींचा आराखडा मंजूर!



मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्राची पूर्व व पश्चिम सीमा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने जोडण्यासाठी विदर्भातील ५४७ किलोमीटर लांबीच्या आणि ५१ हजार कोटी रुपये खर्चाच्या चार द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. हे प्रकल्प जलदगतीने व वेळेत पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे उपस्थित होते. अपर मुख्य सचिव म्हैसकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे प्रकल्पांची माहिती दिली.

महाराष्ट्राचे पूर्व व पश्चिम क्षेत्र जोडणारे आणि विदर्भातील विकासात महत्त्वाचे पाऊल ठरणाऱ्या या प्रकल्पांची पुढील कार्यवाही जलदगतीने करून प्रकल्प वेळेत होईल यावर भर द्यावा. नवेगाव मोर ते सुरजागड हा मार्ग खनिज वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हा मार्ग समृद्धी महामार्गाला जोडण्यात यावा, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. तसेच पश्चिम महाराष्ट्र ते कोकणाला जोडणाऱ्या टनेल रस्त्यासंदर्भात अभ्यास करून सादरीकरण करण्याचे आदेशही फडणवीस यांनी यावेळी दिले.

यावेळी नागपूर – गोंदिया प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्ग, भंडारा गडचिरोली द्रुतगती मार्ग, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग आणि नवेगाव मोरे- कोनसारी ते सुरजागड ग्रीन फिल्ड रस्ता या प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना यावेळी मान्यता देण्यात आली. या चारही प्रकल्पांची किंमत ५१ हजार ९०६कोटी रुपये एवढी आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या महामार्गांचे काम केले जाणार आहे. हे सर्व प्रकल्प सप्टेंबर २०२८ ते डिसेंबर २०२८ या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे म्हैसकर यांनी यावेळी सांगितले.

**प्रकल्पांची वैशिष्ट्ये**

नागपूर – गोंदिया द्रुतगती मार्ग :एकूण लांबी – १६२.३७७ किलोमीटर
प्रारंभ व शेवटचा बिंदू – गवसी मानपूर, नागपूर ते सावरी, गोंदिया
आवश्यक भूसंपादन – १६३४.२७ हेक्टर
हा महामार्ग नागपूर, भंडारा व गोंदिया या तीन जिल्ह्यांना जोडला जाणार

भंडारा- गडचिरोली द्रुतगती मार्ग
एकूण लांबी – ९४.२४१ किलोमीटर
प्रारंभ व शेवटचा बिंदू – बोरगाव, जि. भंडारा ते ऋणमोचन, जि. चंद्रपूर
आवश्यक भूसंपादन – ११८५.७३ हेक्टर
हा महामार्ग भंडारा, गोंदिया, गडचिरोली या तीन जिल्ह्यांना जोडला जाणार

नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग
एकूण लांबी – २०४.७९९ किलोमीटर
प्रारंभ व शेवटचा बिंदू – सेलडोह, जि. वर्धा ते नवेगाव मोरे (घाटकुळ),जि. चंद्रपूर
आवश्यक भूसंपादन – २१५९.०८७ हेक्टर
हा महामार्ग नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील ९ तालुक्यांना जोडला जाणार आहे.

नवेगाव मोरे- कोनसारी ते सुरजागड ग्रीन फिल्ड रस्ता
एकूण लांबी – ८५.७६५ किलोमीटर
प्रारंभ व शेवटचा बिंदू – नवेगाव मोरे (घाटकुळ), जि. चंद्रपूर ते मंगेर, जि. गडचिरोली

## सोन्या-चांदीवरील आयात शुल्कात वाढ



मुंबई : (स. गांवकरी)

सरकार सोन्याच्या आयातीबाबत अधिक कठोर भूमिका घेत असल्याचे दिसत आहे. सोन्याच्या आयातीसंदर्भातील नियमांमध्ये सरकारनं पुन्हा एकदा सुधारणा केली आहे. आयात होणाऱ्या सोन्याच्या प्रमाणावर मर्यादा घातली आहे. देशातील वाढत्या सोन्याच्या आयातीला आळा घालण्यासाठी सरकारने अधिक कडक नियम केले आहेत. नवीन नियम नेमका काय करण्यात आला आहे, याबाबतची माहिती पाहुयात.

सोने खरेदीच्या बाबतीत सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. आता सोन्याच्या खरेदीवर मर्यादा आली आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने आपल्या नियमांमध्ये किंचित बदल करुन, 'अ‍ॅडव्हान्स ऑथोरायझेशन स्कीम' अंतर्गत एका वेळी जास्तीत जास्त 100 किलोग्रॅम सोन्याच्या आयातीला परवानगी दिली आहे. यापूर्वी यासाठी कोणतीही निश्चित मर्यादा नव्हती. त्यामुळं सोन्याच्या खरेदीवर आता मर्यादा आली आहे. याआधी सोन्याच्या खरेदीवर कोणतीही मर्यादा नव्हती, आता मात्र बंधने असणार आहेत.

'अ‍ॅडव्हान्स ऑथोरायझेशन स्कीम' अंतर्गत, दागिन्यांच्या निर्यातदारांना सोने आणि इतर कच्चा माल शुल्कमुक्त आयात करण्याची परवानगी आहे. याचा उपयोग दागिने आणि निर्यातीसाठी इतर उत्पादने तयार करण्यासाठी केला जातो. सरकारने आता या योजनेत अनेक नवीन अटी जोडल्या आहेत. प्रथमच अर्ज करणाऱ्या कोणत्याही युनिटचे प्रत्यक्ष अस्तित्व, त्याची उत्पादन क्षमता आणि ते कार्यरत आहे की नाही, हे तपासण्यासाठी प्रत्यक्ष तपासणी केली जाईल. याव्यतिरिक्त, निर्यातदाराने पूर्वी निश्चित केलेल्या निर्यात लक्ष्याच्या किमान 50 टक्के साध्य केले असेल तरच नवीन आयात परवाना जारी केला जाईल. सरकारने अहवाल सादर करण्याचे नियमही अधिक कडक केले आहेत. आता आयात आणि निर्यात अहवाल दर 15 दिवसांनी सादर करणे आणि एका स्वतंत्र सनदी लेखापालाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. हा निर्णय अशा वेळी आला आहे, जेव्हा सरकारने सोन्या-चांदीवरील आयात शुल्कात वाढ केली आहे. 13 मे पासून, सरकारने सोन्या-चांदीवरील आयात शुल्क 6 टक्केवरुन 15 टक्के पर्यंत वाढवला आहे. प्लॅटिनमवरील शुल्कही 6.4 टक्केवरुन 15.4 टक्के पर्यंत वाढवण्यात आले आहे. सरकारचे म्हणणे आहे की, मध्य-पूर्वेतील सध्याच्या संकटामुळे तेल आणि इतर आयाती महाग होत आहेत. त्यामुळे, परकीय चलनावरील दबाव कमी करण्यासाठी अनावश्यक आयात कमी करणे आवश्यक आहे.

## भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात उपजिल्हाधिकारी निलंबित



मुंबई : (स. गांवकरी)

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राजकीय नेत्यांनंतर आता प्रशासकीय अधिकारीही अडचणीत आले असून खरात सोबत आर्थिक व्यवहार केल्याच्या आरोपावरुन उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे- पाटील यांचे निलंबन करण्यात आल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी केली. झोपडपट्टी पुनर्वनस प्राधिकरणात सक्षम प्राधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या भांडे- पाटील यांचे भोंदूबाबा अशोक खरात सोबत आर्थिक व्यवहार केल्याची बाब समोर आली होती. अशोक खरातच्या मुलीच्या आणि पत्नीच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याप्रकरणी भांडे- पाटील यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अशोक खरात याच्यासोबतच अभिजित भांडे याचे कॉल रेकॉर्डस हाती आल्यानंतर महसूलमंत्र्यांनी त्याच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत. खरात आणि अभिजीत भांडे यांच्यामध्ये तब्बल १४३ वेळा फोन कॉल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये अशोक खरातने अभिजीत भांडेला ८३ वेळा कॉल केले आहेत. तर भांडेने खरातला ६० वेळा फोन केल्याचे सांगितले जाते आहे. महसूल विभागाने काढलेल्या निलंबन आदेशानुसार अभिजित भांडे पाटील, उपजिल्हाधिकारी यांचे संघटित गुन्हेगारी, फसवणूक व शोषणाचे गुन्हे दाखल असलेल्या अशोक खरात सोबत निकटचे संबंध असल्याबाबत विविध प्रसार व समाजमाध्यमांवर गंभीर स्वरूपाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

## सुनावणीतून न्यायमूर्ती स्वर्णा कांता शर्मा यांची माघार

### केजरीवाल यांच्यासह ‘आप’ नेत्यांविरोधात अवमान याचिका दाखल






नवी दिल्ली : (स. गांवकरी)

वादग्रस्त अबकारी धोरणाशी संबंधित प्रकरणाच्या सुनावणीतून दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती स्वर्णा कांता शर्मा यांनी अखेर माघार घेतली आहे. पण, अरविंद केजरीवाल आणि आपच्या अन्य चार वरिष्ठ नेत्यांनी समाजमाध्यमांवरून केलेल्या विधानांची उच्च न्यायालयाने दखल घेत, केजरीवाल यांच्यासह आप नेत्यांविरोधात गुन्हेगारी अवमान याचिका दाखल करण्याचे आदेश शर्मा यांनी दिले आहेत. केजरीवाल यांच्यासह मनीष सिसोदिया, संजय सिंग, सौरभ भारद्वाज आणि दुर्गेश पाठक यांच्या विरोधात न्यायालयाने अवमानाची याचिका दाखल केली आहे. या प्रकरणातून माघार घेण्याच्या निर्णयाबाबत न्यायमूर्ती शर्मा यांनी भूमिका स्पष्ट केली. पक्षपातीपणाचा संशय व्यक्त केला जाऊ नये यासाठी आता प्रकरणी अन्य खंडपीठ सुनावणी करेल. “अवमान याचिकेची सुनावणी सुरू ठेवल्यास पक्षकार माझ्यावर वैयक्तिक आकसाचा आरोप करू शकतात”, असे न्यायमूर्ती शर्मा म्हणाल्या. “अरविंद केजरीवाल यांनी कायदेशीर मार्गांचा अवलंब करण्याऐवजी माझी प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न केला. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली न्यायालयाची प्रतिष्ठा कमी करण्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही,” असेही शर्मा म्हणाल्या.

‘रिक्युझल’ मागणी फेटाळण्याच्या निर्णयावर त्या ठाम असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, आदेशातील एक शब्दही बदलणार नाही असे सांगितले. दरम्यान, ज्या न्यायमूर्तींनी अवमानाची कारवाई सुरू केली आहे, ते मुख्य प्रकरणाची सुनावणी सुरू ठेवू शकत नाहीत. परिणामी, हे प्रकरण आता मुख्य न्यायमूर्तींकडे वर्ग करण्यात आले असून, ते नवीन खंडपीठाची नियुक्ती करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. दिल्लीतील वादग्रस्त अबकारी धोरण प्रकरणातील काही संशयित आरोपी आणि इतरांनी समाज माध्यमांवर न्यायमूर्ती स्वर्णा कांता शर्मा यांच्याबाबत बदनामीकारक आणि अपमानजनक वक्तव्य केले आहे. संशयितांचे हे ‘फौजदारी स्वरूपाचा न्यायालयाचा अवमान’ या व्याख्येत बसते, असे निरीक्षण नोंदवत न्यायमूर्ती शर्मा यांनी केजरीवाल यांच्यासह आपच्या नेत्याविरोधात अवमान केल्याप्रकरणी कारवाईची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश गुरुवारी दिले.

याप्रकरणाची सुनावणी सुरु असताना न्यायमूर्ती शर्मा यांनी आपली भूमिका मांडली. “न्यायसंस्थेलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते, त्यावेळी न्यायालय आरोपांच्या प्रभावाखाली येणार नाही, याची खात्री करणे न्यायाधीशांचे कर्तव्य ठरते”, असे शर्मा म्हणाल्या. टीका आणि न्यायालयाच्या विरोधात चालवलेली द्वेषपूर्ण मोहीम यात फरक असल्याचेही शर्मा यांनी यावेळी स्पष्ट केले.









# श्री. संजय भोकरे यांना पोलीस संरक्षणाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## संजय भोकरे यांच्या पाठीशी राज्य सरकार खंबीरपणे उभे : संरक्षण देण्याचे तातडीने आदेश

मुंबई/सांगली : (स. गांवकरी)

भोकरे यांना मि पुर्णपणे ओळखतो त्यांनी पत्रकारीता शैक्षणिक सामाजिक कार्यात मोलाचे योगदान असून अशा लोकांची सुरक्षा करणे हे आमच्या सरकारचे कामं आहे तर त्यांना पोलीस संरक्षण देण्याचे आदेश दिले आहे तर सांगलीत घटनेचा निषेध व्यक्त केला महाराष्ट्र राज्य हे सुजलाम सुफलाम राज्य असुन गुंडागिरीचा बंदोबस्त करण्यासाठी आमचे सरकार या प्रकरणात लक्ष घातले असून पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा यांच्या कडुन माहिती प्राप्त झाली आहे पोलीस यंत्रणा या प्रकरणाचा छडा लावण्यात यशस्वी ठरेल असा मला विश्वास असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना सांगितले

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक आणि 'दैनिक जनप्रवास'चे समूह संपादक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट सांगली पोलिसांनी उधळून लावला आहे. या प्रकरणी तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून पिस्तूल आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, भोकरे यांना तातडीने राज्य भरात फिरताना पोलीस संरक्षण देण्याची मागणी आज पत्रकार संघाने मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मंत्रालयात प्रत्यक्ष भेटून केली आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ. विश्वास आरोटे, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव मंत्रालय संपर्कप्रमुख विष्णू बुरे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसेडर संजय फुलसुंदर, आणि संघाचे सदस्य खंडूराज गायकवाड यांचा शिष्टमंडळात समावेश होता.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री.भोकरे यांना संरक्षण देण्याची मागणी मान्य केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं, चार जिवंत काडतूसं आणि इतर घातक शस्त्रे हस्तगत करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, हे आरोपी फेब्रुवारी महिन्यापासून संजय भोकरे यांची 'रेकी' (पाळत ठेवणे) करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनी हडपण्याच्या उद्देशातून हा सर्व प्रकार सुरू असल्याचे प्राथमिक तपासात दिसत आहे.

या कारवाईनंतर संजय भोकरे यांनी स्वतः 'प्लॅन बी' नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता व्यक्त केली आहे. यावरून संपूर्ण भोकरे कुटुंब गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर असल्याचे स्पष्ट होत आहे.

### पत्रकार संघाच्या प्रमुख मागण्या

- महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात खालील मागण्या केल्या आहेत:
- संजय भोकरे यांच्या जीविताला असलेला धोका लक्षात घेता त्यांना राज्यभर फिरावे लागते त्यांना राज्यभर कडेकोट पोलीस संरक्षण मिळावे.
- या कटामागील मुख्य 'बोलविता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी.

## थोडक्यात पण महत्वाचे




### शिवाजीराव नागवडे डॅफोडील्सच्या खेळाडूचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश

श्रीगोंदा (स. गांवकरी) : शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूलचा खेळाडू यश राजेंद्र खाकाळ याने पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक पटकावले आहे. ८ ते १० एप्रिल दरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस मिलिटरी स्कूल, फुलगाव (पुणे) येथे झालेल्या राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये यशने १३ ते १५ वयोगटातील ४७ किलो वजन गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदक मिळविले. या यशाच्या जोरावर त्याची १७ ते २१ जून २०२६ दरम्यान इंदोर, मध्यप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यश खाकाळच्या या यशाबद्दल त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, शाळा, पालक व प्रशिक्षकांनी त्याचे कौतुक केले आहे.



### साईकृपा कृषी महाविद्यालयाच्या कृषिकन्यांचे उत्साहात स्वागत

श्रीगोंदा (स. गांवकरी) : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत साईकृपा कृषी महाविद्यालय, घारगाव येथील बी.एस्सी. (कृषी) शाखेच्या RAWE (Rural Agricultural Work Experience) कार्यक्रमांतर्गत कृषिकन्यांनी लिंपणगाव येथे ग्रामसंलग्नता परिचय कार्यक्रम उत्साहात आयोजित केला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी कृषिकन्यांनी RAWE कार्यक्रमाचा उद्देश तसेच आगामी उपक्रमांची सविस्तर माहिती ग्रामस्थ व शेतकऱ्यांना दिली. कृषिकन्यांनी सांगितले की, लिंपणगावातील शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित शेती माहिती आणि आधुनिक शेती पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये कृषी मेळावे, पाककला स्पर्धा तसेच कृषी विषयांवरील विविध प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येणार असून, कृषी क्षेत्रातील नवीन मोबाईल ॲप्सची माहितीही गावकऱ्यांना दिली जाणार आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक अद्ययावत माहिती मिळून उत्पादन व उत्पन्न वाढीस मदत होईल, असा विश्वास कृषिकन्यांनी व्यक्त केला.

### जनता कन्या विद्यालयाचा 97.80 टक्के निकाल; ऋतुजा लगड प्रथम

श्रीगोंदा (स. गांवकरी) : शैक्षणिक वर्ष 2025-26 च्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील जनता कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल 97.80 टक्के लागला आहे. या परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण 91 विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी 89 विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. कु. ऋतुजा सुनील लगड हिने 95.40 टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला. कु. धनश्री अरुण पाचपुते हिने 94.20 टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. समीक्षा सावता सरोदे हिने 93.80 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. कु. अनुष्का प्रसाद पाचपुते हिने विज्ञान विषयात 100 पैकी 100 गुण मिळवत विशेष यश संपादन केले. तसेच विद्यालयातील एकूण 13 विद्यार्थिनींना 90 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले. या यशस्वी विद्यार्थिनींना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंगल जोगदंड, पर्यवेक्षक रामदास उगले तसेच शिक्षक संजय मांडे, रफिक शेख, तुकाराम निंबोरे, रामू जाधव, सचिन डमरे, शंकर तातळे, रुपाली शिंदे, स्वर्णलता राऊत, वृषाली परदेशी, शुभम शिंदे, संजय शिंदे आणि पद्मा हगवणे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पालक, ग्रामस्थ व शिक्षण क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### युवासेनेची महत्त्वपूर्ण नियुक्ती

कळवण (स. गांवकरी) : मा. मुख्यमंत्री तथा शिवसेना नेते व खासदार यांच्या नेतृत्वाखाली, तसेच युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशभाई सरनाईक यांच्या आदेशानुसार आणि लोकसभा संपर्कप्रमुख अभिषेक दादा चौधरी, जिल्हाप्रमुख जितेंद्र आबा पगार व युवासेना जिल्हाप्रमुख वैभव महाले यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेनेच्या संघटनात्मक बांधणीसाठी महत्त्वपूर्ण नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. युवासेना व शिवसेनेच्या संघटन विस्ताराला अधिक बळ देण्यासाठी संदीप वाघ यांची युवासेना तालुका प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्याकडे S.I.R. प्रक्रिया तसेच युवासेना सदस्य नोंदणी अभियानासाठी कळवण/सुरगाणा विधानसभा संपर्कप्रमुख ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# श्रीक्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा संपन्न

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत निळोबाराय देवस्थानच्या आषाढी वारी पायी दिंडी पालखी सोहळ्याची बैठक बुधवार दि.13 मे रोजी सकाळी 10 वाजता उत्साहात संपन्न झाली. या बैठकीमध्ये सोहळ्यात चालणाऱ्या वारकऱ्यां साठीच्या विविध सुविधा पूरविण्या बाबत चर्चा झाली.यावेळी दिंडीच्या स्वयंपाकाचा आवश्यक गॅस पुरवठा शासनाचे वतीने करण्यात यावा अशी एकमुखी मागणी वारकऱ्यांनी केली. पालखी सोहळ्याची नियाजनाची बैठक सोहळा प्रमुख गोपाळकाका मकाशीर यांचे अध्यक्षतें खाली तसेच निळोबाराय संस्थांनचे अध्यक्ष अशोकराव सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. याप्रसंगी,देवस्थानचे व सेवामंडळाचे



सर्व विध्वस्थ,100 दिंडीचालक, समस्थ ग्रामस्थ पिंपळनेर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले " ब " वर्ग तीर्थक्षेत्र असलेले श्री संत निळोबाराय महाराज यांची नवव्य क्रमांकाची मानाची दिंडी म्हणून ओळख असलेल्या, श्रीसंत निळोबाराय यांच्या आषाढी वारी पायी दिंडी पालखी सोहळ्याचे पिंपळनेर ते पंढरपूर नियोजनाची बैठक उत्साहात संपन्न झाली.

सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर पायी दिंडी पालखी सोहळ्याचे प्रस्थान प्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री ना सुनेत्राताई पवार, पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी पंकज आशिया, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक व लाखो वारकऱ्यांच्या उपस्थिती मध्ये शुक्रवार दिनांक 10 जुलै 2026 रोजी सकाळी 10:30 वाजता निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून प्रस्थान होऊन दुपारी 3 वाजता निळोबारायांच्या संजीवनी समाधी मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे अशी माहिती श्री संत निळोबाराय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव सावंत यांनी यावेळी बोलताना दिली.

बुधवार दि. 13 मे 2026 रोजी पिंपळनेर येथील निळोबाराय भक्तनिवास मध्ये निळोबाराय पालखी सोहळा प्रमुख ह भ प गोपाळकाका मकाशीर यांच्या अध्यक्षतखाली बैठक पार पडली. यावेळी दामोदर ठुबे या वारकऱ्यांने मांडलेल्या सूचनेनुसार चालू वर्षी गॅस टंचाई असल्यामुळे दिंडी सोहळ्याच्या मुक्कामी गॅसची टंचाई जाणवू नये आणि पुरेसा गॅस साठा सरकारने त्यासाठी तजवीज करावी अशी महत्वाची मागणी केली.

यावेळी राजेंद्र पठारे म्हणाले की,ज्यावेळी पालखी सोहळा पंढरपुराच्या जवळ जातो त्यावेळी पाऊस सुरू झालेला असतो परंतु मुक्कामाच्या ठिकाणी असणारे मंडप गळके असल्याने वारकऱ्यांची मुक्कामाच्या ठिकाणी गैरसोय होती ती होऊ नये म्हणून चांगल्या उत्कृष्ट दर्जाचे मंडप मिळावेत जेणेकरून वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही.

चालू वर्षी रथासाठी दिंडी क्रमांक 8 रुई छत्रपती दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष बंडू बापूराव साबळे यांजकडून बैलजोडीचे सौजन्य देण्यात आले.

नगारा बैलगाडीसाठी सिद्धेश्वर पायी दिंडी सोहळा चे ह भ प अण्णासाहेब चत्तर यांस कडून बैलजोडी चे सौजन्य देण्यात आले.

या नियोजन बैठक प्रसंगी संपत त्रिंबक गाजरे पाटील विजय गुगळे राजेंद्र पठारे जवळे सेवा संस्थेचे अध्यक्ष नाथा रासकर विठ्ठल मंदिर संस्था सचिव जवळे गोरख सालके देवस्थान ट्रस्ट सचिव लक्ष्मण खामकर सेवा संस्था ट्रस्ट सचिव चांगदेव शिर्के माजी सरपंच पिंपळनेर भाऊसाहेब लंटाबळे विणेकरी पांडुरंग रासकर माजी सरपंच पिंपळनेर पांडुरंग सातपुते तसेच पिंपळनेर ग्रामस्थ व पालखी सोहळ्यात सहभागी होणारे दिंडी चालक अध्यक्ष व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

फोटो खालील ओळी श्रीक्षेत्र पिंपळनेर येथे पिंपळनेर ते पंढरपूर पायी पालखी सोहळ्याचे नियोजन बैठक पार पडली.

## कै. सदाशिव किसनराव जाधव यांचे दुःखद निधन

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

गार येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सहकार क्षेत्रातील अनुभवी व्यक्तिमत्त्व कै. सदाशिव किसनराव जाधव (वय ७७) यांचे शुक्रवार दि. ०९ मे २०२६ रोजी पहाटे ४.३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, तीन भाऊ, दोन बहिणी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने गार पंचक्रोशीसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कै. जाधव यांनी सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्यात शेतकी व अकाउंट विभागात तब्बल ३८ वर्षे प्रामाणिक सेवा बजावली. आपल्या कर्तव्यदक्ष आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी सहकारी क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली होती. सामाजिक व राजकीय क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान राहिले. गार ग्रामपंचायतीचे



त्यांनी पाच वर्षे सरपंच म्हणून काम पाहिले. तसेच गार विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन म्हणूनही त्यांनी पाच वर्षे जबाबदारी सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात गावातील अनेक विकासकामे व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्यांच्या निधनाने गार गावाने एक कर्तव्यनिष्ठ, सामाजिक भान जपणारे आणि सहकार क्षेत्रातील अनुभवी नेतृत्व गमावल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# मेधाताई पाटकर यांची मंत्रालयात भेट

## अकोले तालुक्यातील चळवळींच्या कार्याचा आवर्जून गौरव!



मुंबई : (स. गांवकरी)

दिनांक १४ मे रोजी मंत्रालय परिसरात मेधा पाटकर यांची भेट झाली. यावेळी विविध सामाजिक, शैक्षणिक व शेतकरी प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान मेधाताईंनी अकोले तालुक्यातील चळवळींमध्ये सातत्याने कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांच्या कामाचा विशेष उल्लेख केला.यावेळी त्यांनी अकोले तालुक्यातील चळवळीचे नेते डॉ. अजित नवले, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे, भाऊसाहेब चासकर तसेच शेतकरी संघटनेचे नेते दशरथ सावंत यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. अकोले तालुक्यात सामाजिक चळवळी पुढे नेण्यासाठी अनेक कार्यकर्ते सातत्याने कार्यरत असल्याचेही त्यांनी सांगितले.


या प्रसंगी डॉ. विश्वासराव आरोटे, निलेश सोमाणी, नवनाथ जाधव, विष्णू बुरे तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर उपस्थित होते.

मंत्रालयातील या भेटीत सामाजिक चळवळी, शेतकरी प्रश्न, शिक्षण व्यवस्था आणि ग्रामीण भागातील जनआंदोलनांच्या भविष्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती उपस्थितांनी दिली.

## मे, शिवकृपा कृषी विकास केंद्र माळकौठा यांच्यावर गुन्हा नोंद

नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)

दिनाक ९ मे २०२६ रोजी नांदेड जिल्हयातील युरीया खत व इतर खताच्या तपासणी संबंधाने जिल्हयातील कृषी केंद्रांना भेटी देऊन तपासणी करण्याचे आदेशाच्या अनुषंगाने प्रमोद हिलालपुरे कृषी अधिकारी गुणनियंत्रण तालुका कृषी अधिकारी कार्यालय मुदखेड व मुंडे बी. बी. तंत्र अधिकारी (गुणनिंयत्रण),वि.कृ.स.स.कार्यालय लातुर, सचिन कपाळे मोहिम अधिकारी जि.प. नांदेड, अमोल पेकम जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक नांदेड, व्हि. एस. निरडे, कृषी अधिकारी मुदखेड असे मुदखेड तालुक्यात कृषी केंद्राची तपासणी करत 16 वा. सुमारास मे, शिवकृपा कृषी विकास केंद्र माळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड येथे भेट देऊन युरीया खत तपासणीच्या अनुषंगाने गोदामाची व दुकानाची तपासणी केली असता त्यांच्या इ-पॉस साठ्यानुसार IPL कंपनीचा 1.65 मे.टन., NFL कंपनीचा 2.56 मे. टन, इफको 18 मे.टन, CFCL 17.28 मे.टन. असा



एकूण 58.47 मे.टन युरीया व IPL कंपनीचा DAP 2.25 मे. टन, खत साठा इ-पॉस मध्ये आढळून आला. परंतु प्रत्यक्षात पहाणी केली असता नमुद दुकानात व गोदामामध्ये युरीया व DAP खताची एकही बॅग (पोते) आढळुन आले नाही.

सदरील खत गोदामात अथवा दुकानात आढळुन आला नसल्यामुळे दुकानदार माधव विठ्ठलराव हाळे यांना सदरील युरिया खत कोणकोणत्या शेतकऱ्यास विक्री केला या बाबतचे विक्री बिलाची मागणी केली असता विक्री बिल सादर करु शकले नाहीत.

या व्यतीरीक्त इतर युरीया खत 57.59 मे.टन व DAP 2.25 मे.टन हे कोणास विक्री केला याचा बोध होत नाही.

तसेच स्टॉक बुक मध्ये व भाव फलकावर नोंद नसल्याचे आढळुन आले. यावरून दिंनाक ९ मे रोजी मे. शिवकृपा कृषी विकास केंद्र माळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड या कृषी सेवा केंद्राचे मालक दुकानदार माधव विठ्ठलराव हाळे यांनी अत्यावश्यक वस्तु कायदा 1955 कलम 3,7 खत निंयत्रण आदेश 1985 चे कलम 19 चे उल्लंघन केले असल्याचे दिसुन आले.

अनुदानीत रासायनिक खताचा काळाबाजार करुन अकृषक कामासाठी अवैधरित्या विक्री करुन, शासकीय अनुदान लाटुन शेतकरी व शासनाची फसवणुक केली असल्यामुळे मे. शिवकृपा कृषी विकास केंद्र माळकौठा ता. मुदखेड यांचे विरुध्द भारतीय न्याय संहीता कलम 318(4) सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम 1955 चे कलम 3,7, सह कलम खत नियंत्रण आदेश 1985 मधील कलम 2, 3, 4, 5, 6, 7, 8(1), 9, 19, 220, 25(1),(2),(3),28(1)(A),(4), 35 (1) (A) (B) सह खत(वाहतुक/ हताळणी) निंयत्रण आदेश 1973 खंड 2,3,4 चे उल्लंघन अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

## कन्या विद्यालय तालुक्यात अव्वल

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालात श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने उत्कृष्ट यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. तालुक्यातील प्रथम तीन क्रमांक पटकावण्याचा मान याच विद्यालयातील विद्यार्थिनींनी मिळवला आहे. विद्यालयातील कु. पूर्वा युवराज रणसिंग हिने ९८.२० टक्के गुण मिळवत विद्यालयासह संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. कु. ज्ञानदा लक्ष्मण शेंडे हिने ९७.६० टक्के गुणांसह तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. संस्कृती नंदकुमार गायकवाड हिने ९७.०० टक्के गुण मिळवत तालुक्यात तृतीय क्रमांक प्राप्त केला. याशिवाय कु. प्रणाली परसराम लांडगे व कु. अनुष्का पंकज कदम यांनी प्रत्येकी ९६.६० टक्के गुण मिळवले, तर कु. अस्मिता अशोक टकले हिने ९६.०० टक्के गुण मिळवत विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थिनींमध्ये स्थान मिळवले. यावर्षी विद्यालयातून एकूण २४३ विद्यार्थिनी परीक्षेला प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी २३९ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून विद्यालयाचा एकूण निकाल ९८.३५ टक्के लागला आहे. निकालामध्ये ९५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या ९ विद्यार्थिनी, ९० ते ९४ टक्के गुण मिळवणाऱ्या २४ विद्यार्थिनी तसेच ८० ते ८९ टक्के गुण मिळवणाऱ्या ६२ विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे, पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे, गुरुकुल प्रमुख श्री. किरण शिंदे, इयत्ता दहावीचे सर्व वर्गशिक्षक व सेवकवृंद यांनी अभिनंदन केले. तसेच रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य श्री. बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुलदादा जगताप, जनरल बॉडी सदस्य श्री. कुंडलिकराव दरेकर, लाईफ वर्कर्स, लाईफ मेंबर्स, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, विद्या समिती, पालक-शिक्षक संघ, सल्लागार समिती, माता पालक समिती सदस्य तसेच पंचक्रोशीतील पालकांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले.

# ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पुण्यातील मुक्काम पालखी विठोबा मंदिरात राहणार

## ॲड राजेंद्र उमाप आळंदी देवस्थान, पालखी सोहळा मालक यांची संयुक्तिक पत्रकार परिषदेत घोषणा

आळंदी : (स. गांवकरी)

पुणे जिल्हाधिकारी यांनी पुण्यातील दोन दिवसांचे पालखी सोहळ्यास सेवा सुविधा आणि प्रशस्त जगासह इतर मागण्यांवर आळंदी देवस्थानला हमी पत्र आहे. या मुळे श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा पुण्यातील मुक्काम या वर्षी ही पूर्वी प्रमाणे श्री पालखी विठोबा मंदिरात राहणार असल्याची माहिती माऊलींचे पालखी सोहळ्याचे प्रमुख व देवस्थानचे विश्वस्त ॲड राजेंद्र उमाप यांनी दिली. आळंदी देवस्थान, पालखी सोहळा मालक यांची संयुक्तिक पत्रकार परिषदेत त्यांनी घोषणा केली. आळंदी देवस्थानचे भक्त निवास येथे झालेल्या पत्रकार परिषदेस श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉक्टर भावार्थ देखणे, विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे कबीरबुवा, पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर, विश्वस्त ॲड. रोहिणी पवार, भाऊ महाराज फुरसुंगीकर, पालखी दिंडी समाज संघटना गोसावी महाराज, व्यवस्थापक माऊली वीर आदी मान्यवर उपस्थित होते. पुण्यातील भवानी पेठेतील श्री पालखी विठोबा मंदिर येथे ९ व १० जुलै २०२६ रोजी श्रींचा पालखी सोहळा मुक्कामी राहणार आहे. तत्पूर्वी आळंदी मंदिरात श्रींचे पालखी सोहळ्याचे प्रस्थान ८ जुलै २०२६ ला लाखो भाविकांचे उपस्थितीत होणार आहे. पुण्यातील पालखी सोहळा मुक्काम परिसरातील नागरी सेवा सुविधा आदी मुळे मुक्कामाचे जागे बाबत विविध मागण्या करण्यात आल्या होत्या. यात रस्ता रुंदीकरण व पायाभूत सुविधा रस्ता निर्मिती अतिक्रमण हटवून मोकळ्या झालेल्या जागेवर भाविकांसाठी सोयीस्कर प्रवासा साठी सुस्थितीतील रस्ता तयार करण्यात आला आहे. विद्युत खांब स्थलांतर रस्त्यावर अडथळा ठरणारे इलेक्ट्रिक पोल सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहेत. पालखी मार्ग अतिक्रमण मुक्त मोहीम पालखी ज्या मार्गाने जाणार आहे, त्या संपूर्ण मार्गावरील फ्रंट मार्जिन मधील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे काढण्यासाठी महानगरपालिकेने युद्धपातळीवर कारवाई सुरू केली आहे. यामुळे पालखी सोहळ्यास मार्गस्थ होताना कुठेही अडथळा येणार नाही.

जिल्हा प्रशासन पालखी सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी कटिबद्ध आहे. पालखी विठोबा मंदिर, भवानी पेठ येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा मुक्काम या वर्षीही नेहमी प्रमाणे याच ठिकाणी करावा, अशी विनंती पुणे जिल्हा प्रशासनाने लेखी हमी पत्र देऊन केली आहे. यासाठी प्रशासनाने जागा मोकळी करणे,




रस्ता बनवणे, विजेचे खांब हलवणे आणि संपूर्ण मार्ग अतिक्रमणमुक्त करणे यासाठी पावले उचलली आहेत, जेणेकरून पालखी सोहळा सुरळीत पार पडेल.

रस्ता निर्मिती - अतिक्रमण हटवून मोकळी झालेल्या जागेवर भाविकांना ये-जा करण्यासाठी चांगला आणि सोयीचा रस्ता तयार करण्यात आला आहे. विद्युत खांब स्थलांतर - रस्त्यावर अडथळा ठरणारे वीजेचे खांब सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहेत. पालखी मार्ग अतिक्रमण मुक्त मोहीम - पालखी ज्या मार्गाने जाणार आहे, त्या मार्गावरील फ्रंट मार्जिनमधील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे काढण्याची धडक कारवाई महानगरपालिकेकडून युद्धपातळीवर सुरू आहे. यामुळे पालखीच्या मिरवणुकीला कुठेही अडथळा येणार नाही. जिल्हा प्रशासन पालखी सोहळा शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पूर्ण पणे सज्ज आहे. पालखी विठोबा मंदिर, भवानी पेठ येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा मुक्काम या वर्षी ही दरवर्षी प्रमाणे त्याच ठिकाणी मुक्काम करावा असे हमी पत्र देऊन आळंदी देवस्थानला विनंती पुणे जिल्हाधिकारी यांनी अपरा एकादशी दिनी केली. या वर आळंदी देवस्थान विश्वस्त मंडळ, पालखी सोहळा दिंडी समाज संघटना, पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर यांची संवाद बैठक होऊन मान्यता देण्यात आली. पुण्यातील दोन दिवसांचा पालखी सोहळा मुक्काम भवानी पेठेतील श्री पालखी विठोबा मंदिरात ठेवण्याचे अंतिम निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप यांनी जाहीर केला. या मुळे पुण्यातील पालखी मुक्कामाचा विषय मार्गी लागला आहे. या निर्णयासाठी गेले दोन महिने संवाद, बैठका, पत्रव्यवहार सुरू होता.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पोलीस विभागाकडून ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप

भिवंडी (स. गांवकरी) : आपत्कालीन परिस्थितीमध्ये गावपातळीवर तातडीने आणि प्रभावी प्रतिसाद देता यावा यासाठी पोलिस विभागाच्या वतीने महत्त्वपूर्ण पुढाकार घेण्यात आला आहे. दि. १२ मे २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, पडघा येथे पडघा, डोहोळे आणि बापगाव ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप करण्यात आले. ठाणे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर यांच्या हस्ते या किटचे वितरण करण्यात आले. नैसर्गिक आपत्तींच्या काळात गावपातळीवर प्राथमिक मदत व बचावकार्य तत्काळ सुरू करता यावे, यासाठी या किटमध्ये आवश्यक साहित्याचा समावेश करण्यात आला आहे. विशेषतः पूर, वादळ, आग किंवा इतर आपत्कालीन घटनांमध्ये ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी ही किट उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून स्थानिक प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्यातील समन्वय अधिक बळकट होणार आहे. कार्यक्रमास संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, तलाठी, सरपंच, सदस्य तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



### सांगली येथील श्रीकांत मुळे यांची एसआरपीएफ मध्ये निवड

अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील सांगवी येथील अल्प भूधारक शेतकरी भाऊराव मुळे यांच्या मुलगा श्रीकांत भाऊराव मुळे यांची धुळे येथील एसाआरपीएफ निवड झाल्याचे कळताच गावकऱ्यांनी निवडीचे जल्लोषात स्वागत केले आहे. सांगवी येथील विद्यार्थी श्रीकांत भाऊराव मुळे हे शेती करत शिक्षणा कक्ष देत जिद्द व चिकाटीने अभ्यास करून या एसआरपीएफ मध्ये यश मिळविले आहे. श्रीकांत भाऊराव मुळे यांची एसआरपीएफ निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून आई व वडीलांच्या सत्कार करून जल्लोष केला यावेळी गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुरी गोलवाडे स्कुलचा ९२. ३० निकाल



रावेर (स. गांवकरी) : श्री स्वामी समर्थ शैक्षणिक सांस्कृतिक मंडळ भादली खु ता. जि .जळगाव संचलित माध्यमिक विद्यालय पुरी-गोलवाडे ता. रावेर जि.जळगाव येथिल एस एस सी परीक्षा फेब्रु/मार्च 2026) शाळेचा एकूण निकाल-:92.30% टक्के लागला असून , कु. वंशिका सुनील पाटील (गोलवाडे)-:89.60% गुण मिळवून प्रथम कृमांक मिळवला असून दुसरा क्रमांक चि.दिपेश नारायण सुतार (पुरी)-:87.00% तिसरा.कु.संस्कृती किरण पाचपोळे (गोलवाडे)-:86.40% तर चौथा.चि. यश चिंतामण तायडे (गोलवाडे)-:82.20% 5वा.चि.ओम सुनील तायडे (पुरी)-:82:00% चि. करण नितीन पाटील(पुरी)-:82:00% सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोजकुमार आत्माराम पाटील सर व मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!




### समर्थ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे नॅशनल अबॅकस स्पर्धेत दैदिप्यमान यश

बेल्हे (स. गांवकरी) : समर्थ रुरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल बेल्हे, बांगरवाडी या सीबीएसई मान्यताप्राप्त अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांनी नॅशनल अबॅकस कॉम्पिटिशनमध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. १४ वी पामा इंडिया अबॅकस आणि मेंटल अरिदमॅटिक राष्ट्रीय स्पर्धा २०२६ ही शिर्डी येथे उत्साहात पार पडली. देशभरातून सुमारे २५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने स्पर्धेला भव्य स्वरूप प्राप्त झाले होते. या प्रतिष्ठित स्पर्धेत जुन्नर तालुक्यातील बेल्हे बांगरवाडी येथील समर्थ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेचा गौरव वाढविला. अशी माहिती समर्थ गुरुकुलचे प्राचार्य श्री. सतीश कुऱ्हे यांनी दिली. समर्थ गुरुकुलमध्ये पामा इंडिया संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणारा अबॅकस प्रशिक्षण उपक्रम अत्यंत यशस्वी ठरत असून त्याचाच प्रत्यय विद्यार्थ्यांच्या या यशातून दिसून आला आहे. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे – चॅम्पियन :१) पारस मोरे २) स्मितल निमसे ३) स्वरा देशमाने प्रथम विजेते : १) स्वरा मते २) शरण्या गुंजाळ ३) नूर आत्तार द्वितीय विजेते :१) मृण्मयी अल्हाट २) हिंदवी आग्रे ३) हर्षद गुंजाळ ४) देवांश निमसे ५) आर्या देशमाने६) आरोही आवटी,७) अर्णवी गाडगे तृतीय विजेते : १) ज्ञानेश्वरी डावखर,२) दूर्वा कणसे या सर्व विद्यार्थ्यांना अक्षरशिल्प पामा इंडिया यांच्या मार्गदर्शक शिक्षिका सारिका काळे व वेदिका आरगडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. वसंतरावजी शेळके, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शेळके, सचिव विवेकभाऊ शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके सर, विश्वस्त सारिका ताई शेळके, समर्थ गुरुकुलच्या संचालिका सौ. स्नेहल ताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी श्री. प्रदीप गाडेकर, पर्यवेक्षक हरिश्चंद्र नरसुडे, मातेले सर तसेच सर्व प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# संजयजी भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी : कमलाकर सोनकांबळे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, अक्कलकोटच्यावतीने तहसीलदारांना निवेदन



संजयजी भोकरे यांच्या जीविताला असलेला धोका पाहता त्यांना तात्काळ 'झेड प्लस' सुरक्षा प्रदान करावी.सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेली धमकी आणि सध्याचा कट यांचा परस्परांशी संबंध आहे का, याची सखोल चौकशी व्हावी.या कटामागील मुख्य 'बोलवता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी.राज्याच्या गृहमंत्र्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पत्रकारितेतील एका ज्येष्ठ व्यक्तीला आणि त्यांच्या कुटुंबाला कडेकोट सुरक्षा पुरवावी.

**- कमलाकर सोनकांबळे, अध्यक्ष -महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोट**

संजय भोकरे यांच्यासारख्या ज्येष्ठ पत्रकाराला जीवे मारण्याचा कट रचला जाणे, ही लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेली मोठी टांगती तलवार आहे. पोलिसांनी हा कट उधळून लावून मोठे अनर्थ टाळले असले, तरी ही घटना पत्रकारितेसाठी अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक आहे.राज्यात 'पत्रकार संरक्षण कायदा' अस्तित्वात असूनही अशा घटना घडणे दुर्दैवी आहे.या कायद्याची अधिक कडक अंमलबजावणी करून पत्रकारांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. लेखणीवर होणारा हल्ला हा विचारांवर होणारा हल्ला आहे. शासनाने वेळीच पावले उचलून गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करावा.

**- विश्वनाथ चव्हाण -सचिव,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोट**

अक्कलकोट : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे व सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष संजयजी भोकरे यांच्या हत्येचा कट पोलिसांनी उधळून लावल्याने राज्यात खळबळ माजली आहे.या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, राज्य शासनाने त्यांना तातडीने 'झेड प्लस' (Z+) दर्जाचे पोलीस संरक्षण पुरवावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोटच्या वतीने राज्याच्या गृहमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सांगली पोलिसांनी नुकतीच धडाकेबाज कारवाई करत संजयजी भोकरे यांच्या हत्येचा मोठा कट उधळून लावला आहे.या प्रकरणात पोलिसांनी तीन संशयित आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं चार जिवंत काडतूसं धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

भोकरे यांना 'प्लॅन बी' नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता आहे. तरी राज्य शासनाने त्यांना तातडीने 'झेड प्लस' (Z+) दर्जाचे पोलीस संरक्षण पुरवावे या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार विनायक मगर यांच्याकडे देण्यात आली.यावेळी सचिव विश्वनाथ चव्हाण, पत्रकार बसवराज बिराजदार, पत्रकार चेतन जाधव, पत्रकार समाधान अहिरे, पत्रकार दयानंद दणुरे, पत्रकार अभिजीत पतकी, पत्रकार महेश गायकवाड, पत्रकार गौतम बाळशंकर, पत्रकार रेवणसिद्ध पुजारी,पत्रकार गणेश भालेराव,पत्रकार निंगाप्पा निंबाळ यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

## प्रा. डॉ. धनंजय मंडलिक यांची अधिष्ठाता (डिन) पदी निवड

अकोले : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील उंचखडक बु येथील डॉ. धनंजय मंडलिक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या अधिष्ठाता (डिन) पदी निवड झाली आहे. ही निवड काल बुधवार दि. 13 मे 2026 रोजी झाल्याचे पत्र प्रभारी कुलसचिव प्रफुल्ल पवार यांनी प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे डॉ. मंडलिक यांचे शैक्षणिक, सामाजिक व व्यापारी क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घ अनुभव, अभ्यासू वृत्ती आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोनामुळे डॉ. धनंजय मंडलिक यांनी शिक्षण क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या निवडीमुळे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेला नवी दिशा आणि बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. डॉ. मंडलिक यांनी यापूर्वी विविध शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. संशोधन, गुणवत्ता वृद्धी आणि आधुनिक शिक्षणपद्धती यावर त्यांनी सातत्याने भर दिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या या निवडीबद्दल अहिल्यानगर, नाशिक, पुणे विभागातील विविध संस्था, प्राध्यापक, विद्यार्थी व अकोले तालुक्यातील तसेच उंचखडक बु परिसरातील सर्व ग्रामस्थ मान्यवरांनी डॉ. मंडलिक यांना शुभेच्छा देत स्वागत केले आहे.

## शेठ टी. जे. हायस्कूल व एन. के. टी. टी. इंग्रजी माध्यम शाळेचा दहावीचा निकाल शंभर टक्के!

**मातोश्री साकरबेन रामदास ठक्कर माध्यमिक शाळेचेही घवघवीत यश; गुणवंत विद्यार्थ्यांनी वाढविला कच्छचा मान!**

(स. गांवकरी)



श्री कच्छ अंजार लोहाणा बोर्डिंग ट्रस्ट संचालित विविध शैक्षणिक संस्थांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात आपला लौकिक पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. शेठ टी. जे. हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून, शेठ एन. के. टी. टी. इंग्रजी माध्यम शाळेनेही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. तसेच ट्रस्ट संचालित मातोश्री साकरबेन रामदास ठक्कर माध्यमिक शाळेचा सन २०२६ मधील इयत्ता दहावीचा निकाल देखील शंभर टक्के लागला असून, विद्यार्थ्यांच्या उज्वल यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निकालामध्ये तेजस्वी विद्यार्थिनी जानकी डी. सोरठिया हिने ९१.२५ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. ध्रुवी ए. सोरठिया हिने तब्बल ९९.४३ टक्के गुण मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला. तसेच प्रियांशी उदेशी हिने ९०.०८ टक्के गुण प्राप्त करून विशेष यश मिळविले आहे. या गुणवंत विद्यार्थिनींनी शाळेसह संपूर्ण कच्छ समाजाचा गौरव वाढविला आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विविध कला, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्येही शाळेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुंबई येथील रंगोत्सव सेलिब्रेशन संस्था आयोजित आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत संस्थेचा सन्मान वाढविला. याशिवाय शाळेला पाच तारांकित पुरस्कारांपैकी साडेचार ताऱ्यांचा "वर्ल्ड एज्युकेशन प्रेस्टिज पुरस्कार" प्राप्त झाला आहे. तसेच विद्यार्थी कॅडेट प्रकल्प अंतर्गत विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचीही विशेष दखल घेण्यात आली आहे. या सर्व यशाबद्दल संस्थेचे प्रमुख श्री नानजीभाई ठक्कर यांनी संपूर्ण शिक्षकवर्ग, पालकवर्ग, विद्यार्थी आणि कर्मचारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. संस्थेच्या प्रगतीमध्ये सर्वांचे सहकार्य महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शेठ श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठानावाला यांच्या वतीने सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक आणि संपूर्ण कर्मचारी परिवाराचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, भविष्यातही अशीच उज्वल यशपरंपरा कायम राहो, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

## बांधकाम उद्योग क्षेत्रातील नेत्यांनी दिला शाश्वततेवर भर

पुणे : (स. गांवकरी)




मुंबईत ३ ते ५ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या 'वर्ल्ड ऑफ कॉंक्रिट इंडिया'च्या १२ व्या आवृत्तीच्या पार्श्वभूमीवर, इन्फॉर्मा मार्केट्सतर्फे पुण्यात एका विशेष गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत पुणे आणि पश्चिम भारतातील वेगाने वाढणाऱ्या पायाभूत सुविधा, नवीन बांधकाम साहित्य आणि शाश्वत बांधकाम पद्धतींच्या गरजेवर सखोल चर्चा झाली. या गोलमेज परिषदेच्या चर्चेत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (BAI), पुणे चे राज्य सचिव श्री. मनोज देशमुख; आर्किटेक्ट्स इंजिनियर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनचे (AESA) अध्यक्ष महेश बांगड; इंडस्ट्रियल फ्लोअरिंग असोसिएशनचे (IFA) अध्यक्ष आणि अ‍ॅव्हकॉन टेक्निक्सचे व्यवस्थापकीय संचालक अजय सिंगम; १लॅटिस, आईजीएस चे वरिष्ठ संचालक श्री. सुयोग केळुस्कर; सिका इंडियाचे संचालक (टार्गेट मार्केट अँड प्रॉडक्ट मॅनेजमेंट) श्री. जसवंत शोभना; बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजीचे महाव्यवस्थापक (अभियांत्रिकी विभाग) श्री. आप्पासाहेब भोसले आणि इन्फॉर्मा मार्केट्स इन इंडियाचे वरिष्ठ गट संचालक श्री. रजनीश खट्टर यांचा समावेश होता. या नेत्यांनी बाजारपेठेतील संधी, शाश्वत कार्यपद्धती आणि विकासाला चालना देण्यामध्ये नावीन्यपूर्णतेची असलेली परिवर्तनात्मक भूमिका यावर आपले विचार मांडले.कॉंक्रिट क्षेत्रातील भारतातील या एकमेव सर्वसमावेशक प्रदर्शनात यंदा ३५० हून अधिक आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत ब्रँड्स आणि १८,००० हून अधिक व्यावसायिक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. खर्च, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचा अवलंब यांसारख्या प्रमुख आव्हानांना तोंड देण्यासाठी उद्योग आणि सरकार यांच्यात अधिक मजबूत सहकार्याची गरज अधोरेखित करताना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (BAI), पुणे चे राज्य सचिव श्री. मनोज देशमुख म्हणाले, "भारतातील बांधकाम उद्योगाला तंत्रज्ञानाचा अवलंब आणि वाढता खर्च यापासून ते कामगारांशी संबंधित बदल, कौशल्यातील तफावत आणि पैशांच्या देयकातील विलंब अशा अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

जरी आपण 'कंत्राटदार'कडून 'रचनाकार' म्हणून विकसित झालो असलो, तरीही हे क्षेत्र मानवी श्रमावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे आणि यामुळे कौशल्य विकास, अभियंत्यांना वैधानिक मान्यता आणि उद्योग-सरकार यांच्यातील मजबूत संवाद अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या आव्हानांना न जुमानता, भारतीय बांधकाम व्यावसायिकांनी स्थानिक मनुष्यबळाच्या मदतीने वेळेत प्रकल्प पूर्ण केले आहेत."

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बदल्या समुपदेशनाद्वारे

ठाणे : (स. गांवकरी)

- आरोग्य विभागाचे वेळापत्रक जाहीर

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांसाठी समुपदेशन प्रक्रियेला गती देत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि त्यात सुसूत्रता आणण्यात भर देण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ एप्रिल २०२६ नुसार समुपदेशनाद्वारे सर्वसाधारण बदल्या करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, त्याअनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा यांनी ८ परिमंडळातील सर्व कार्यक्रम प्रमुख यांच्या बदल्यांचे टप्प्याटप्प्याने वेळापत्रक जाहीर केले आहे. जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार रिक्त पदांची यादी ६ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर बदलीपात्र कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी ८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केली गेली. तसेच, प्रपत्र १ ते ५ तयार करून नागरी सेवा मंडळासमोर १० मे २०२६ रोजी सादर करण्यात आली. नागरी सेवा मंडळाकडून समुपदेशनाने बदलीचे अंतिम प्रस्ताव १५ मे २०२६ पर्यंत पाठविण्यात येणार आहेत. समुपदेशनाद्वारे करण्यात आलेल्या अंतिम बदल्यांचे आदेश ३१ मे रोजी वेबसाईटवर निर्गमित करण्यात येणार आहेत. या सर्व बदली प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी चार वरिष्ठ अधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# नगर-कल्याण महामार्ग ठप्प होणार : गावांमध्ये बैठका

पारनेर : (स. गांवकरी)

- कांदा उत्पादकांच्या मागण्यांसाठी रवींद्र राजदेव मैदानात
- हजारो शेतकरी ट्रॅक्टरसह रस्त्यावर उतरणार
- टाकळी ढोकेश्वर परिसरात आंदोलनाची जय्यत तयारी



**आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गावागावांमध्ये बैठका**

टाकळी ढोकेश्वर परिसरातील पिंपळगाव रोठा, वडगाव सावताळ, सावरगाव, नांदूर पठार, काटाळवेढा, पळसपुर म्हसोबा झाप, पोखरी, खडकवाडी, देसवडे या भागात नगर कल्याण महामार्गावर कांदा प्रश्नी रस्ता रोको रवींद्र राजदेव यांचे नेतृत्वाखाली करण्यात येणारे आंदोलनाची जय्यत तयारी सुरू असून प्रत्येक गावात ठिकाणी बैठका घेऊन आंदोलनाची तयारी करण्यात येत आहे मोठ्या संख्येने हजारो शेतकरी ट्रॅक्टर बैलगाडी सह रस्त्यावर उतरणार आहेत.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली १५ मे रोजी नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गटाचे खंबीर नेते आणि नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन छेडले जाणार असून, यामुळे जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर परिसरातील गावांमध्ये रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या बैठका होत आहेत व या बैठकांच्या माध्यमातून आंदोलनाची जय्यत तयारी सुरू आहे.

सध्या बाजारात कांद्याला मिळणारा भाव अत्यंत कमी असून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर कांद्याला योग्य हमीभाव मिळावा, निर्यातबंदी कायमस्वरूपी हटवावी, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, शेतीपंपांचे वीज बिल माफ करावे आणि पीकविम्याची रक्कम तातडीने मिळावी या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. रवींद्र राजदेव यांनी या आंदोलनाबाबत माहिती देताना सांगितले की, शेतकरी सध्या आर्थिक संकटात असून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याच्या बेतात आहेत. जर सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही, तर हे आंदोलन अधिक उग्र रूप धारण करेल. रवींद्र राजाराम राजदेव हे पारनेर तालुक्यातील एक सक्रिय सामाजिक आणि राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात . 'जनसेवक' अशी प्रतिमा असलेल्या राजदेव यांनी यापूर्वीही रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या प्रश्नांवर यशस्वी लढे दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी संलग्न असलेले राजदेव हे निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत असून, त्यांना सोनियाताई राजदेव यांची ग्रामीण विकासाच्या कामात मोठी साथ लाभते. या रस्ता रोको आंदोलनासाठी शेतकऱ्यांनी कांद्याच्या माळा घालून आणि ट्रॅक्टरसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सतर्क झाले असून वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.

# खंडणी मागणी प्रकरणी प्रियकराचा काटा

## मुंब्रा पोलीसांकडून क्लिष्ट गुन्हयाची उकल

ठाणे : (स. गांवकरी)

दि ३ एप्रिल २०२६ रोजी मुंब्रा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे अरबाज मकसुदअली खान हे दादर येथे कामाचे पैसे घेण्यासाठी जावून येतो असे सांगून घरातून निघून गेले. त्यानंतर तो घरी परत न आल्याने त्याचे वडील मकसुद अली खान, यांनी दिलेल्या खबरीवरून मुंब्रा पोलीस ठाण्यात मानव मिसिंग रजिस्टर नंबर ९६/२०२६ अन्वये नोंद करण्यात आले होती. सदर मानव मिसिंग पोउपनि / सावंत हे तपास करीत असतांना तपासामध्ये बेपत्ता व्यक्तीच्या मोबाईल क्रमांकाचा कॉल डिटेल्स् प्राप्त करुन, तांत्रीक विश्लेषण केले असता, मयत व्यक्तीचा मोबाईल फोन लास्ट लोकेशन हे भोईदावाडा वसई परीसरात आल्याचे निष्पन्न झाले. तसेच नमुद दिवशी अरबाज याची प्रियशी मेहजबीन हिचे देखील मोबाईल फोनचे लोकेशन वसई येथे आल्याचे आढळून आले. त्यानंतर महिला नामे मेहजबीन नावाच्या




महिलेस पोलीस ठाण्यात बोलावून घेवून बेपत्ता इसम याचे अनुषंगाने विचारणा केली असता, प्रथम तिने उडवाउडविची उत्तरे दिली. नमुद महिलेस विश्वासात घेवुन सखोल विचारणा केली असता, तिने तिचा पती हसन व भाऊ तारीक व मित्र मुज्जूम पाठण यांचे सोबत मिळून खंडणी मागणी व जिवे ठार मारण्याचे उद्देशाने वसई येथे बोलावून घेवून बेपत्ता असलेली व्यक्ती अरबाज याचा खुन केला असल्याचे कबुली दिली. त्यांनी केलेल्या खुनाबाबत सखोल विचारपुस केली असता बेपत्ता युवकाचा खंडणी मागणी व जिवे ठार मारण्याचे उद्देशाने पुर्वनियोजीत कट करून बेपत्ता युवकाकडे पैशांची मागणी केली असता, बेपत्ता अरबाज याच्याकडे पैसे नसल्याने त्याचे हातपय बांधुन प्लास्टिकच्या पाईपने मारहाण करून जिवे ठार मारून पुरावा नष्ट करण्याचे उददेश्याने त्याचे प्रेताची एका हिरव्या रंगाच्या ड्रममध्ये भरून वालीव पोलीस ठाणे हद्दीत निर्जन स्थळी नाल्यात (गटारीत) टाकुन विल्हेवाट लावल्याचे उघड झाले. प्रसंगी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं ७५०/२०२६ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १४०, ३(५), वाढीव कलम १०३(१), २३८ भारतीय न्याय संहिता दिनांक. ०३/०५/२०२६ रोजी गुन्हा नोंद करून मेहजबीन खातून इकरान शेख व तिचा भाऊ तारीक इकरान शेख यांना अटक करण्यात आले.



संपूर्ण हिंदुस्थानातील थोर शुरविर संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव

## थोडक्यात बातम्या...

### वैशाख वद्य एकादशी निमित्त हजारो भाविकांनी घेतले "पैस" खांबाचे दर्शन



नेवासा (स. गांवकरी) : वैशाख वद्य अपरा एकादशीच्या निमित्ताने नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज "पैस"खांब मंदिरामध्ये हजारो भाविकांनी ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करत माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या "पैस" खांबाचे दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी येथे मंदिर प्रांगणात टाळ मृदुंगाच्या गजरात हजेरी लावली. नेवासा पंचक्रोशीतून व तालुक्याबाहेरून आलेल्या पायी दिंडयांचे संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी स्वागत केले. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या वैशाख वद्य अपरा एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊलीच्या "पैस"खांबास यजमानांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला.यावेळी आदिनाथ महाराज पांगरे,संतसेवक दामोदर पवार विश्वस्त मंडळी उपस्थित होते. एकादशीचे औचित्य साधून माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी,संत ज्ञानेश्वर माऊली पैस खांब,भगवान दत्तात्रय,करविरेश्वर, वैकुंठवाशी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर परिसर गर्दीने गजबजून गेला होता.मंदिर परिसरात विविध दुकाने उभारण्यात आल्याने यात्रेचे स्वरूप परिसराला प्राप्त झाले होते. एकादशी निमित्त गंगापूर येथील श्री विठ्ठल आश्रमाचे प्रमुख गाथामूर्ती हभप रामभाऊजी महाराज राऊत यांचे किर्तन झाले.कीर्तनाला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले.

### डॉ. अमितकुमार खाडे यांना आंतरराष्ट्रीय पोस्ट-डॉक्टरल फेलोशिप



कराड (स. गांवकरी) : कराड येथील ह्यूमन या आंतरराष्ट्रीय जर्नलचे मुख्य संपादक तसेच अधिव्याख्याता डॉ. अमितकुमार आनंदराव खाडे यांना आशिया-आफ्रिका डेव्हलपमेंट कौन्सिल आणि पुणे येथील डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावरील पोस्ट-डॉक्टरल फेलोशिप प्रदान करण्यात आली. डॉ. खाडे यांनी यापूर्वी २०२४ साली पीएच.डी. पदवी संपादन केली असून त्यानंतर त्यांनी औषध क्षेत्रातील संशोधन कार्य सातत्याने सुरू ठेवले. पारंपरिक औषध दुकानांमध्ये अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज ऑनलाईन औषध दुकानांशी स्पर्धा करण्यासाठी त्यांनी 'ब्रिक अँड क्लिक मॉडेल ऑफ फार्मसी' हे अभिनव मॉडेल विकसित केले आहे. या संशोधनामुळे भारतातील सुमारे ९.५० लाख फार्मसींना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा लाभ होऊ शकतो. या संशोधनासाठी त्यांना भारत सरकारकडून प्रताधिकार (कॉपीराइट) प्राप्त झाले आहेत. त्यांच्या संशोधन लेखांचे प्रकाशन आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध नामांकित जर्नल्समध्ये झाले आहे. तसेच ते राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्ष, महाराष्ट्र राज्य येथे प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून अनेक रुग्णांना वैद्यकीय सहाय्य मिळत आहे. या यशामागे त्यांचे मार्गदर्शक डॉ. कुणाल पाटील, डॉ. अविनाश पवार, डॉ. राहुल पोळ आणि डॉ. प्रल्हाद मुदाळकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

### बसच्या वेळापत्रक बदलाची मागणी

डांग, गुजरात (स. गांवकरी) : नाशिक – अहवा – वघई बसच्या वेळापत्रकात बदल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी बसचा मार्ग आणि वेळ बदलावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागाकडे करण्यात आली आहे. सध्याच्या वेळापत्रकामुळे आहवा, वघई आणि परिसरातील प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांना बससाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत असून बस अनियमित वेळेत पोहोचत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. निवेदनानुसार, बस नाशिक – त्र्यंबकेश्वर – सापुतारा –आहवा या मार्गावर सुरू केल्यास प्रवाशांना नाशिकमध्ये दिवसभर काम करून त्याच दिवशी परत येणे सोयीचे ठरेल. तसेच पर्यटन, व्यापार आणि खरेदीसाठीही याचा फायदा होईल व प्रवाशांची संख्या वाढेल, असा दावा करण्यात आला आहे. यासंदर्भात परिवहन विभागाने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### तालुक्यातील ग्रामविकास अधिकाऱ्यांची मालिका की ठेकेदारांची लूट?

कळवण (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील अनेक काही ग्रामपंचायतींमध्ये विकासकामांच्या नावाखाली गंभीर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय दिवसेंदिवस अधिक गडद होत चालला आहे. शासनाकडून विकासकामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित ठेकेदारांना देण्यात येणारी दहा टक्के अंतिम रक्कम आणि अनामत रक्कम अडकवून ठेवण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.

## बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पोचे उद्‌घाटन

पुणे : (स. गांवकरी)

हयात रीजेंसी, विमाननगर, पुणे येथे आज २ऱ्या 'बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पो २०२६' ला उत्साहात प्रारंभ झाला. कृषी जैविक (Agricultural Biologicals) क्षेत्रातील धोरणकर्ते, शास्त्रज्ञ, उद्योग क्षेत्रातील नेते, नवोन्मेषक, कृषी-इनपुट कंपन्या, स्टार्टअप्स आणि जागतिक स्तरावरील विविध भागधारकांना एका व्यासपीठावर आणणाऱ्या या परिषद व प्रदर्शनाचे आयोजन स्नेल इंटिग्रल प्रा. लि. यांच्या वतीने करण्यात आले आहे. "कृषी जैविक उत्पादनांच्या निर्मितीसाठी भारत जागतिक उत्पादन केंद्र" ही या प्रतिष्ठित दोन दिवसीय परिषद व प्रदर्शनाची मुख्य संकल्पना आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाराष्ट्र शासनाचे कृषिमंत्री तथा प्रमुख पाहुणे मा. दत्तात्रय भरणे यांच्या विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे झाले. त्यांनी परिषदेला अधिकृतपणे उद्‌घाटन करताना शाश्वत शेती, मातीचे आरोग्य




सुधारणा आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या माध्यमातून भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी कृषी जैविक उत्पादनांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. उद्‌घाटन प्रसंगी बोलताना श्री. दत्तात्रय भरणे म्हणाले, "शाश्वत शेती आणि अन्नसुरक्षेसाठी कृषी जैविक उत्पादने हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनत आहे. नवोन्मेष, संशोधन आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि भारत या क्षेत्रात जागतिक नेतृत्व करू शकतात." उद्‌घाटन सत्रात स्नेल इंटिग्रल प्रा. लि. चे संस्थापक व व्यवस्थापकीय भागीदार श्री. अमित बीके खरे, कान बायोसिसच्या सीएमडी तथा बायोॲग्री नेक्स्ट आयोजन समितीच्या सह-अध्यक्षा सौ. संदीपा कानिटकर, क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनचे मुख्य शाश्वतता अधिकारी व ग्रीनॲग प्रमुख श्री. सर्जीवन मनहास, आयसीएआर-आयआयएचआरचे माजी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. राव, महाराष्ट्र कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी श्री. सुनील बोरकर आणि नोव्होनेसिसचे दक्षिण आशिया, मध्य पूर्व व आफ्रिका विभागाचे कृषी प्रमुख श्री. शन्मुगम संबंथन यांचा मान्यवर पॅनेलमध्ये समावेश होता.

या मान्यवरांनी कृषी जैविक क्षेत्रातील भारतासमोरील नव्या संधी तसेच भारताला जागतिक उत्पादन व नवोन्मेष केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी शासन, उद्योग, संशोधन संस्था आणि शेतकरी यांच्यात अधिक मजबूत सहकार्याची गरज यावर चर्चा केली. या परिषदेला देश-विदेशातील कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार, संशोधक, धोरणकर्ते आणि कृषी व्यवसाय क्षेत्रातील तज्ज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उद्‌घाटन दिनी जैवखते, बायोस्टिम्युलंट्स, जैविक कीटकनाशके, शाश्वत पीक पोषण, हवामान बदलास अनुकूल शेती, नियामक धोरणे आणि जागतिक कृषी जैविक बाजारपेठेत भारतासाठी उपलब्ध संधी यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा झाली.

## 'एचपीव्ही' लसीकरणासाठी पुढाकार घ्या

ठाणे : (स. गांवकरी)

जिल्ह्यातील किशोरवयीन मुलींना भविष्यातील गर्भाशय मुख कर्करोग आजारापासून संरक्षण मिळावे यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'एचपीव्ही' (HPV) लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. १४ वर्षे पूर्ण झालेल्या व १५ वर्षे पूर्ण न झालेल्या सर्व मुलींना ही लस शासनामार्फत विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली असून, पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. भारतामध्ये महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग (Cervical Cancer) हा दुसऱ्या क्रमांकाचा गंभीर आजार मानला जातो. सन २०२४ च्या ICMR-NCRP अहवालानुसार, भारतात दरवर्षी सुमारे ७८ हजारांहून अधिक महिलांना या आजाराचे निदान होते, तर ४२ हजारांपेक्षा अधिक महिलांचा मृत्यू होतो. 'एचपीव्ही' लसीकरणामुळे या कर्करोगास कारणीभूत ठरणाऱ्या विषाणूपासून संरक्षण मिळून भविष्यातील धोका मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होते. आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे की, 'एचपीव्ही' लस पूर्णपणे सुरक्षित आणि वैज्ञानिकदृष्ट्या प्रमाणित आहे. ही लस सन २००६ पासून जगभरात वापरली जात असून ५० कोटींहून अधिक महिलांनी ती घेतली आहे. महाराष्ट्र राज्यातही हजारो मुलींना लसीकरण करण्यात आले असून कोणतेही गंभीर दुष्परिणाम आढळलेले नाहीत.

## मोदींच्या इशाऱ्यानंतर इंधन टंचाईची चाहूल

संगमनेर : (स. गांवकरी)

गेल्या दोन दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "मध्यपूर्वेतील तणाव कायम राहिला तर पेट्रोल-डिझेलच्या किमतीत तब्बल २५ ते २८ रुपये प्रतिलिटर वाढ होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी इंधनाची बचत करावी, विजेचा वापर कमी करावा आणि देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी सहकार्य करावे," असे आवाहन केले होते. त्याचाच परिणाम आज, दि. १४ मे रोजी नाशिक ते संगमनेर मार्गावर पाहायला मिळत आहे. अनेक इंधन पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून आले असून काही ठिकाणी "पेट्रोल-डिझेल शिल्लक नाही" असे फलक लावण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनीही आपल्या विशेष लेखांमधून इशारा दिला असून, "लवकरच नागरिकांना पेट्रोल-डिझेल दरवाढीचा मोठा फटका बसू शकतो. पेट्रोल-डिझेलच्या किमतीत २५ ते ३० रुपयांपर्यंत वाढ होण्याची



नाशिक–संगमनेर मार्गावरील इंधन पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा!

शक्यता नाकारता येत नाही," असे मत व्यक्त केले आहे. दैनिक लोकमतचे संगमनेर येथील प्रतिनिधी संजय गोपाळे यांनी सांगितले की, सध्या देशात इंधन टंचाईची परिस्थिती जाणवत असून त्याचाच परिणाम इंधन पंपांवर दिसून येत आहे. इंधन पंप चालक जाणीवपूर्वक साठेबाजी करत आहेत असे वाटत नाही; मात्र वरूनच पेट्रोल-डिझेलचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने ग्राहकांना त्याचा फटका बसत आहे. दरम्यान, आगामी काळात इंधनाच्या दरामध्ये २५ ते ३० रुपयांपर्यंत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, वाहनचालक आणि वाहतूक व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मुरघास संयंत्र वाटप योजनेद्वारे पशुपालकांना उद्योजकतेची नवी संधी

### पशुसंवर्धन विभागामार्फत मुरघास हार्वेस्टर व बेलर संयंत्रावर भरघोस अनुदान

ठाणे : (स. गांवकरी)

पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून पशुपालकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनामार्फत "वैरण विकास योजना" अंतर्गत "मुरघास संयंत्र वाटप योजनेद्वारे उद्योजकता विकास करणे" ही महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र पशुपालक व शेतकरी समूहगटांना मुरघास हार्वेस्टर व बेलर संयंत्र खरेदीसाठी भरघोस अनुदान देण्यात येणार असून, जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. पशुपालकांना चारा व्यवस्थापन सुलभ करून आधुनिक पद्धतीने पशुपालन व्यवसाय विकसित करण्यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या माध्यमातून पशुपालकांना उद्योजकतेकडे वाटचाल करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना एकाच वेळी चार ओळी हार्वेस्ट करणारे मुरघास हार्वेस्टर आणि मुरघास बेलर संयंत्र उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपकरणाची किंमत कमाल २६ लाख रुपये इतकी निर्धारित करण्यात आली असून, सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदान (कमाल रु. १३ लाख) तर अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान (कमाल रु. १९.५० लाख) देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराकडे किमान १० मोठे पशुधन किंवा १०० शेळ्या/मेंढ्या असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराकडे स्वतःचा किमान ५० HP क्षमतेचा ट्रॅक्टर असणे बंधनकारक आहे. निवड प्रक्रियेत अत्यल्प भूधारक, अल्प भूधारक, वनहक्क धारक तसेच महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाणार आहे. योजनेमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तर महिलांसाठी ३० टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे.

शेतकरी समूहगटांनाही लाभ : "वैरण विकास योजना" अंतर्गत शेतकरी उत्पादक संस्था (FPO), शेतकरी उत्पादक कंपनी (FPC), नोंदणीकृत शेतकरी समूह, महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत नोंदणीकृत समूह आधारित संसाधन केंद्र तसेच उमेद अंतर्गत नोंदणीकृत प्रभाग संघ यांचाही योजनेत समावेश करण्यात आला आहे.

या समूहगटांकडे किमान ५० शेतकरी सदस्य, किमान ५ लाख रुपये भागभांडवल तसेच मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण पूर्ण असणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण अहवालानुसार संस्था नफ्यात असणे बंधनकारक राहणार आहे.

निवड झालेल्या लाभार्थ्यांनी जिल्हा उपआयुक्त कार्यालयाकडून कळविण्यात आल्यानंतर एका महिन्याच्या आत आवश्यक रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील. मंजुरीनंतर तीन महिन्यांच्या आत संयंत्र खरेदी करणे बंधनकारक असून, अन्यथा प्रतीक्षा यादीतील पुढील अर्जदारास संधी देण्यात येणार आहे. अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात DBT पद्धतीने जमा करण्यात येणार आहे.

ही योजना पशुपालकांना चारा टंचाईवर प्रभावी उपाय उपलब्ध करून देण्यासोबतच दुग्ध व्यवसाय व पशुपालन अधिक फायदेशीर बनविण्यास मदत करणार आहे. पात्र पशुपालक, महिला बचत गट तसेच शेतकरी समूहांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालयाशी संपर्क साधून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

### आवश्यक कागदपत्रे

योजनेसाठी अर्ज करताना पशुधन विकास अधिकाऱ्यांचे पशुधन संख्या प्रमाणपत्र, ट्रॅक्टरचे आरसी कार्ड, बँकेचे कर्ज मंजुरी पत्र किंवा स्वनिधीची उपलब्धता दर्शविणारे बँक स्टेटमेंट सादर करणे आवश्यक आहे. दिव्यांग लाभार्थ्यांसाठी UDID प्रमाणपत्र तसेच बचत गट सदस्यांसाठी संबंधित नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहणार आहे.

## जलदुत सुखदेव फुलारी यांनी बालकांना दिले पाणी बचतीचे धडे

### प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातील बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिरात उत्स्फूर्त प्रतिसाद

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्व विद्यालयात उन्हाळयाच्या सुट्टीचे औचित्य साधून राजयोगिनी सरला दिदी यांच्या प्रेरणेने व राजयोगिनी वंदना दिदी यांच्या नेतृत्वाखाली तीन दिवशीय बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.भेंडा येथील जेष्ठ पत्रकार जलदुत सुखदेव फुलारी यांनी बालकांना प्रात्यक्षिकांद्वारे पाणी बचतीचे धडे देऊन पाण्याच्या बचती विषयी जनजागृती केली.पाण्याची बचत



करणे ही काळाची गरज असून पाण्याचा वापर काटकसरीने करा असा संदेश त्यांनी यावेळी बोलतांना दिला. यावेळी बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिरात "पाण्याची बचत काळाची गरज"याविषयावर बाल चिमुकल्यासाठी जलदुत पत्रकार सुखदेव फुलारी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रमुख राजयोगिनी सरलादिदी राजयोगिनी वंदना दिदी,पत्रकार सुधीर चव्हाण,बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिरातील प्रशिक्षणार्थी दीपा शिरसाठ,सुनीता पवार व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी जलदूत सुखदेव फुलारी यांनी पाणी बचतीचे महत्व विषद करतांना विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत प्रश्न विचातुन त्यांना बोलते केले. यावेळी बालसंस्कार शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आम्ही येथून पुढे जेवढे पिण्यासाठी तसेच वापरासाठी पाणी लागेल तेवढ्याच पाण्याचा वापर करू,ग्लासात उरलेले पाणी इतर ठिकाणी फेकून न देता ते झाडांना देऊ,पाण्याचा वापर कसा करता येईल त्यासाठी घरापासून सुरुवात करू,आईवडील व इतर नातेवाईक यांना देखील पाणी बचतीबद्दल जनजागृती करू असा संकल्प केला. पाणी आडवा,पाणी जिरवा,रेन वॉटर हार्वेस्टिंग या विषयावर राज्यभर व्याख्याने देऊन जल जागृती केल्याबद्दल सुखदेव फुलारी यांचा राजयोगिनी सरलादिदी यांच्या हस्ते भेट वस्तू,पुष्प शाल श्रीफळ व पुस्तिका भेट देऊन कार्याचा गौरव करण्यात आला.सदर शिबिरात मुलांना मोबाईल दूर ठेवण्याचा प्रयत्न करा,अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करून वेळापत्रक बनवा,मैदानी खेळ खेळण्यासाठी पुढे या असे आवाहन करण्यात आले. तीन दिवस चाललेल्या बालसंस्कार व्यक्तिमत्त्व शिबीर प्रसंगी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना उपस्थित अतिथींच्या हस्ते पारितोषिकांचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी शिबिरात सहभागी होऊन आमच्या ज्ञानात भर पडली असल्याचे मनोगत व्यक्त करून सांगितले उपस्थित विद्यार्थ्यांनी गीतांवर नृत्य सादर करून उपस्थित पालकांचीही मने जिंकली.राजयोगिनी वंदना दिदी यांनी सूत्रसंचालन करून उपस्थित पालकांचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)